पोलीस अधीक्षक कार्यालय,वजिराबाद चौक नांदेड

EMAIL ID:- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

# प्रेसनोट

दिनांक–26.05.2025

## सिटी स्ट्रिट सेफ्टी पथकाची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे व साहित्य विक्री करणारे इसमांवर धडक कारवाई..

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने मा. **श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख **सपोनि श्री भागवत नागरगोजे** व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दिनांक 25 मे 2025 रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे, दारूचे साहित्य विकणारे व दारू पिऊन शांतता भंग करणारे इसमांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

1) **पोलीस स्टेशन वजिराबाद** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पट्रोलींग दरम्यान रेल्वेस्टेशन परिसरात 01 इसम आणि मुख्यबसस्थानक येथे 02 इसम मद्यप्राशन करत असतांना मिळुन आल्याने त्यांचेवर कलम 110/117 म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

2) **पोलीस स्टेशन विमानतळ** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान 02 इसम सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर स्प्लेंडर वाहनावर कर्कश आवाज करीत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून त्यांचेवर कलम 198 मोटार वाहन कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

3) **पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण** :– सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असतांना ढवळे कॉर्नर येथे 04 इसम सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्याचे साहित्य पाणी व ग्लास विकत घेत असतांना मिळुन आले. तसेच इंदिरा गांधी परिसरात 01 इसम दारू पिऊन गोंधळ घालुन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आला, गुरूवार बाजार परिसरात 01 इसम दारू पित असतांना मिळुन आला, वसरणी येथे मोकळया जागेत 01 इसम दारू पित असतांना मिळुन आला. असे एकुण 07 इसमांवर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे कलम 110/117 म.पो.का. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये, तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये, व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये, अन्यथा संबधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असे आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड